# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई-५१.
फोन नं.२६४७ ४८ ९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६ १९
ई-मेल-jtdirrom@gmail.com website – www.jdteromumbai.com

परिपत्रक
**प्रथम प्राधान्य**

क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१८/ ३५०१
दिनांक : 20 OCT 2018

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानीत,
खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित
निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था

**विषय : DBT Portal द्वारे विद्यार्थ्यांनी भरलेल्या ऑनलाईन फॉर्म्सासाठी आढावा बैठक**
संदर्भ : या कार्यालयाचे १. पत्र क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१८/३३६८, दि. ११/१०/२०१८
२. परिपत्रक क्र. २/विकामुं/तंशि/वसतीगृह/२०१८/३३१९, दि. ०९/१०/२०१८

सर्व शासकीय (शासकीय अभिमत विद्यापीठांसह), अशासकीय अनुदानीत व खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित (खाजगी अभिमत/स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे वगळून) एमबीए, एमसीए, वास्तुशास्त्र, अभियांत्रिकी पदवी/पदविका, औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका महाविद्यालयांना कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यांत येणाऱ्या खालील योजनांचा समावेश महाराष्ट्र शासनाच्या डीबीटी पोर्टलवर करण्यांत आला आहे. :

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२. डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाहभत्ता योजना
३. राज्य सरकारची अल्पसंख्याक योजना

या अनुषंगाने सर्व संस्थांच्या प्राचार्यांनी ह्या कामाचे गांभिर्य ओळखून एका जबाबदार अधिकाऱ्यांची नियुक्ती करुन त्यांच्या संस्थेतील संबंधीत काम हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यासह आपल्या संस्थेमध्ये वरील प्रत्येक योजनेसाठी खालील तक्त्यातील केंद्रावर त्या केंद्रासमोर नमूद केलेल्या दिनांकास ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन फॉर्म्स आपल्या संस्थेकडे सादर केले असतील त्याचा गोषवारा विहीत विवरणपत्रामध्ये घेऊन न चुकता उपस्थित रहावे. हे काम अत्यंत तातडीचे असल्याने संस्थेने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याने कोणतीही अन्य कामे असल्याबाबतचा निर्वाळा न देता न चूकता ह्या बैठकीस उपस्थित रहावे. सदर काम दि. २५/१०/२०१८ पर्यंत कोणत्याही परिस्थितीत पूर्ण करुन घेण्याबाबतचे आदेश वरिष्ठ कार्यालयामार्फत दिलेले असल्याने सर्व प्राचार्यांनी ह्या संवेदनशील विषयाकडे अत्यंत गांभीर्यपूर्वक पहावे. ह्या कार्यालयामार्फत दि. १६/१०/२०१८ रोजी मुंबई मध्ये झालेल्या ओरिएंटेशन प्रोग्रॅममध्ये संबंधीत संस्थांच्या प्रतिनिधींना याबाबतची पूर्व कल्पना दिलेली असून हे काम कोणत्याही परिस्थितीत दि. २५/१०/२०१८ पर्यंत पूर्ण करावे अशा सूचनाही देण्यांत आलेल्या आहेत.

| अ.क्र. | संस्थांच्या परिसराचे विवरण | आढावा बैठक दिनांक व वेळ | बैठकीचे केंद्र |
|---|---|---|---|
| १. | मुंबई शहर व मुंबई उपनगरातील संस्था (मध्य रेल्वेवरील भांडूप पर्यंतच्या संस्था व पश्चिम रेल्वेवरील भाईंदर पर्यंतच्या संस्था) | दि. २२/१०/२०१८ सकाळी १०.३० वाजता | शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई |
| २. | मध्य रेल्वेवरील मुलुंड ते कर्जतपर्यंतच्या संस्था | दि. २३/१०/२०१८ सकाळी १०.३० वाजता | व्ही.एन. बेडेकर मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट, ठाणे |

...२.

| अ.क्र. | संस्थांच्या परिसराचे विवरण | तपासणीसाठी दिनांक | तपासणीसाठीचे केंद्र |
|---|---|---|---|
| ३. | नवी मुंबई अंतर्गत परिसरातील सर्व संस्था (लोणेरे, पेण, नवीन पनवेल, पनवेल, खालापूरपर्यंतच्या संस्थांसह) | दि. २३/१०/२०१८ दुपारी २.३० वाजता | तेरणा कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, नेरुळ, नवी मुंबई |
| ४. | कोकण प्रांतातील संस्था रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्व संस्था | दि. २४/१०/२०१८ दुपारी १२ वाजता | शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी |
| ५. | पश्चिम रेल्वेवरील नायगाव ते डहाणू पर्यंतच्या संस्था (वाडा, विक्रमगड येथील संस्थांसह) | दि. २४/१०/२०१८ दुपारी १२ वाजता | सेंट जॉन कॉलेज ऑफ इंजिनियरिंग अँड मॅनेजमेंट, वेवूर, पालघर |

सर्व संस्थांना कळविण्यांत येते की, बैठकीस येताना खालील नमुन्यात तिन्ही योजनांच्या ऑनलाईन फॉर्म्सचा गोषवारा सोबत आणावा. तसेच सदर बैठकीपर्यंत आपणांस येणाऱ्या अडचणींसंदर्भात पोर्टलवर पाठविलेल्या ग्रिवान्सेस द्वारे आपणांस प्राप्त झालेल्या डीबीटी तिकीटांच्या प्रतिही सोबत आणाव्यात.

| Scheme Name | Application Received | Application Approved | Pending at Institute Clerk | Pending at Institute Principal | Reason for Pending with DBT Ticket No. |
|---|---|---|---|---|---|
| Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulkh Shishyavrutti Yojna (EBC) | | | | | |
| Dr Punjabrao Deshmukh Vastigruh Nirvah Bhatta Yojna (DTE) | | | | | |
| Scholarship for students of minority communities pursuing Higher and Professional courses (DTE) | | | | | |

तसेच वरील संदर्भीय क्र.२च्या परिपत्रकान्वये मुंबई व मुंबई उपनगरातील संस्थांमध्ये जे विद्यार्थी वसतिगृहामध्ये राहण्यांस इच्छुक आहेत परंतु अद्यापही त्यांना वसतीगृह प्राप्त झालेले नाही. अशा पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांचे अर्ज नियम व निकषांन्वये सर्व संबंधीत संस्थानी सदर आढावा बैठकीस येताना सोबत घेऊन यावेत. याकरिता शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१८/प्र.क्र.२४९/१८/तांशि-४, दि. १३/०७/२०१८ व संकिर्ण-२०१८/प्र.क्र.२८५/१८/तांशि-४, दि. १०/०८/२०१८ चे अवलोकन करावे. तसेच इतरही जिल्ह्यातील संस्थांमधील प्राचार्यांनी जे विद्यार्थी वसतिगृहामध्ये राहण्यांस इच्छुक आहेत परंतु अद्यापही त्यांना वसतीगृह प्राप्त झालेले नाही. अशा पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांचे अर्ज नियम व निकषांन्वये सर्व संबंधीत संस्थानी सदर आढावा बैठकीस येताना सोबत घेऊन यावेत.

(प्रमोद अं. नाईक)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई